साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

# विपस्सना

साधक (मराठी)

बुद्धवर्ष 2568, पौष पौर्णिमा, 13 जानेवारी, 2025, वर्ष 8 अंक 10

**वार्षिक शुल्क** रु. 100/- मात्र (भारताबाहेर पाठविण्यासाठी US $ 50)

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

## धम्मवाणी

**न वे कदरिया देवलोकं वजन्ति, बाला हवे नप्पसंसन्ति दानं।**
**धीरो च दानं अनुमोदमानो, तेनेव सो होति सुखी परत्थ॥**

*धम्मपदपाळि 177, लोकवग्गो*

कृपण (लोक) देव लोकात जात नाहीत, मूढ (लोक) सुद्धा दानाची प्रशंसा करीत नाहीत. पंडित (व्यक्ती) दानाचे अनुमोदन करीत त्याने (कर्माच्या आधारे) च परलोकात सुखी होतो.

## सयाजी ऊ बा खिन आणि विपश्यना पगोडा

*आचार्य सत्यनारायण गोयंका*

मानवजातीच्या इतिहासात केव्हातरीच असा कोणी सत्पुरुष जन्म घेतो की जो जनकल्याणासाठी असे कोणते तरी महत्वपूर्ण काम करून जातो ज्यामुळे त्याचा प्रभाव शतकानुशतके लोकांच्या जीवनावर कायम राहतो. सयाजी ऊ बा खिन असेच एक धर्मपुरुष होते, संतपुरुष होते. बर्माने ज्या गुरु-शिष्य परंपरेने प्राप्त झालेल्या विपश्यना विद्येला अनेक शतकांपर्यंत शुद्ध रूपात कायम ठेवले, ते त्या परंपरेचे चमकणारे तारे होते. तसे तर त्यांच्या हृदयात संपूर्ण विश्वासाठी अपार करुणा ओसंडून वाहत होती परंतु भारताच्या प्रति त्यांचे प्रेम अनुपम होते, अनोखे होते.

ते म्हणत असत की मी न जाणे किती वेळा भारतात जन्मलो आहे आणि न जाणे किती जन्मांमध्ये मी हिमालयाच्या पर्वत-गुहांमध्ये ध्यान केले आहे. या शतकाच्या सहाव्या दशकात जेव्हा बिहारमध्ये सतत दोन वर्षांपर्यंत दुष्काळ पडला तेव्हा तिथल्या दुर्भिक्ष्य-पीडित लोकांच्या प्रति त्यांच्या मनात करुणेचा सागर उफाळून आला. त्यावेळी त्यांनी रंगूनच्या विपश्यना केंद्राच्या धर्मकक्षासमीप एका कुशल शिल्पकाराद्वारे हिमालयाची प्रतिकृती बनवून घेतली आणि नंतर ते दररोज सकाळी पहाटे चार वाजता उठून ध्यान झाल्यावर या प्रतिकृतीच्या जवळ उभे राहून बराच वेळ मंगल मैत्री देत रहायचे.

भारताचे लोक दु:खमुक्त होवोत, भारताचे लोक धर्मलाभी होवोत, भारताच्या लोकांचे कल्याण होवो! ज्या देशात सिद्धार्थ गौतमने सम्यक संबोधी प्राप्त केली, जी केवळ त्याच्यासाठीच नाही तर संपूर्ण विश्वासाठी परम कल्याणाचे कारण बनली. आज त्याच देशाचे लोक किती पीडीत आहेत, किती दरिद्री आहेत, किती दु:खी आहेत! तिथे धर्माच्या नावावर काय चालू आहे! जाती-जातीचा, वर्गा-वर्गाचा, उच्च-नीचतेचा, मत-मतांतरांचा, संप्रदाय-संप्रदायांचा किती हिंसात्मक विग्रह-विद्रोह चालू आहे, अंतर्विरोध चालू आहे. द्वेष-दुर्भावनांचा आणि अमानुष हत्यांचा किती आतंक पसरला आहे.

ज्या पावन धरतीवर विपश्यनेच्या रूपात शुद्ध सद्धर्माची उत्पत्ती झाली आणि जो देश अनेक शतकांपर्यंत विश्वाच्या दु:खितांना ही विद्या वाटत राहिला, अरे! आज तोच देश आता या विद्येच्या लाभापासून पूर्णपणे वंचित झाला आहे. या महान विद्येचा लाभ घेणे तर दूरच राहिले, तिथल्या लोकांचे किती मोठे दुर्भाग्य आहे की ते विपश्यना शब्दच विसरून गेले आहेत. त्या महान देशाला आपली ही प्राचीन अध्यात्म विद्या पुन्हा प्राप्त झाली तर सारे विग्रह-विद्रोह आपोआप समाप्त होऊन जातील.

ते वारंवार म्हणत असत की अनेक शतकांपूर्वी बर्माने भारतातून हे अनमोल रत्न प्राप्त केले होते. आता वेळ आली आहे. मला हे ऋण चुकवायचे आहे, जिला आपल्या गुरुजनांनी इतक्या प्रयत्नपूर्वक सांभाळून ठेवली ती अनमोल धरोहर(संपत्ती) भारताला द्यायची आहे, भारताला परत करायची आहे. ते वारंवार करुणचित्ताने ही कल्याणी भावना प्रकट करीत असत आणि त्यांची खूप प्रबळ इच्छा होती की ते स्वत: भारतात येऊन हे ऋण चुकवतील. परंतु राजनैतिक परिस्थितींमुळे ते भारतात येऊ शकले नाहीत. परंतु तरीही वारंवार त्यांच्या मुखातून ही धर्मवाणी प्रकट होत असायची की आता विपश्यनेचा डंका वाजला आहे. ही लवकरच भारतात परतेल. त्यांना या गोष्टीवर पूर्ण विश्वास होता की अतीतकाळच्या कोणा संताची ही भविष्यवाणी अवश्य सफलीभूत होईल जिच्यात असे म्हटले गेले होते की तथागतांच्या पंचवीससशे वर्षांनंतरही बर्मामध्ये ही विद्या कायम राहील आणि इथून पुन्हा भारतात परतेल आणि तिथल्या अनेक पुण्य-पारमी-संपन्न समजदार लोकांद्वारे सहर्ष स्वीकारली जाईल.

तेव्हा भारतातून ही विद्या संपूर्ण विश्वात पसरेल आणि खूप मोठे लोक-कल्याण करेल. त्यांची विवशता होती की ते भारतात स्वत: येऊ शकले नाहीत. परंतु त्यांना आपले मंगल वचन पूर्ण करायचे होते. त्यांनी भारतीय मूळ असलेल्या आपल्या धर्मपुत्राला जितके निपुण करता येईल तितके निपुण केले, जितके पक्क करता येईल तितके पक्क केले आणि त्याला आपल्या प्रतिनिधीच्या रूपात भारतात पाठविले. अशा रीतीने सुमारे दोन हजार वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर या महान देशात भगवती विपश्यना विद्येचे पुनरागमन झाले.

मागच्या 29-30 वर्षांमध्ये जितके काम झाले ते खरेतर पर्याप्त नाहीच, परंतु समाधान याच गोष्टीचे आहे की आरंभ तर झाला. आणि आरंभही चांगलाच झाला. आम्ही आभारी आहोत, खूप आभारी आहोत त्या महान संताचे ज्याच्या निष्ठेमुळे आणि तळमळीमुळे भारताला आपली ही हरवलेली अनमोल संपदा प्राप्त झाली. आपण त्या संताच्या ऋणाला कसे विसरू शकतो, त्या ऋणाला कसे चूकवू शकतो?

उपाय केवळ हाच आहे की एकतर आपण स्वत: या विद्येत पक्क व्हावे आणि दुसरे, अधिकहून अधिक लोक या विद्येच्या संपर्कात येऊन आपले

रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK 286/2024-2026

कल्याण साधू शकतील या कार्यात आपण त्यांची सहायता करावी. हेच तर गुरुदेवांचे कल्याणकारी मनोगत होते. हाच त्यांच्या जीवनाचा मांगलिक उद्देश होता, हेच त्यांचे ध्येय होते, हेच त्यांचे प्रेय होते. पुढील वर्ष त्या संत पुरुष सयाजी ऊ बा खिन यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. मुंबई महानगरीत एका विशाल स्तूपाच्या निर्मितीचा शिवसंकल्प घेतला गेला आहे. या निमित्ताने एका प्रबळ पुण्यशाली विपश्यी साधकाच्या परिवाराने अत्यंत श्रद्धापूर्वक अती मौल्यवान जमिनीचे दान दिले, जिथे हा धर्मस्तूप बनेल आणि हा धर्मस्तूप विपश्यनेच्या प्रचार-प्रसाराचे एक विशिष्ट प्रभावशाली माध्यम बनेल.

भगवान बुद्धांच्या अंतिम आदेशानुसार या स्तूपाच्या विशाल धर्मकक्षात त्यांचे अस्थी-अवशेष स्थापित केले जातील, ज्यांच्या धर्मतरंगांचा लाभ घेत जवळपास दहा हजार विपश्यी साधक-साधिका सामूहिक साधनेत भाग घेऊ शकतील. तिथे त्यांच्यासाठी एक दिवसीय शिबिरेही आयोजित केली जातील. कधी-कधी कोणत्या जिज्ञासूंद्वारे हे विचारले जाते की ही विशाल इमारत एखाद्या पगोड्याच्या प्रतिकृतीच्या रूपात का बनवली जावी? याला कोणत्या भारतीय मंदिराचे रूप का दिले जावू नये? समजून घेऊया की असे का केले जात आहे.

स्तूपाची संरचना आतून वर्तुळाकार असेल तर ध्यानाचे तरंग अधिक स्थायी आणि अधिक बलवान होतात आणि हा धर्मस्तूप तर विपश्यना ध्यानासाठी बनविला जात आहे. याचे स्वरूप कोणत्या मंदिराच्या रूपात असू शकत नाही. यात कोणती मूर्ती स्थापित होणार नाही ना कोणते षोडशोपचार पूजन होईल, ना कोणते भजन-कीर्तन होईल, ना कोणती पूजा-अर्चा होईल, ना कोणते धूप-दीप जाळले जातील, ना कोणती पाने, फुले, नैवेद्य इत्यादी चढवले जातील, ना घंटा-घड्याळे वाजवून कोणाची आरती केली जाईल, ना अन्य कोणत्या प्रकारचे सांप्रदायिक कर्मकांड केले जाईल.

धर्मस्तूपाच्या आतमध्ये केवळ मोठ्या संख्येने साधक ध्यान करतील आणि तेही कोणत्या मूर्तीचे ध्यान करणार नाहीत, कोणत्या आकृतीचे ध्यान करणार नाहीत. कोणते नाम-जप करणार नाहीत, कोणते मंत्र-जप करणार नाहीत, नाहीतर हे सर्व सांप्रदायिक होऊन जाईल. केवळ विपश्यना ध्यानासाठीच या स्तूपाचा उपयोग होईल, ज्यात साधक आपल्यातील विकारांच्या कारणांना आणि त्या कारणांच्या निवारणाच्या उपायाला खूप सजगतापूर्वक जाणत राहण्याचा अभ्यास करतील.

विपश्यनेचा हा अभ्यास सांप्रदायिक नाही, कोणत्या एका संप्रदायाशी जोडला गेलेला नाही. याची सार्वजनिकता स्वयं-सिद्ध आहे. याकरीता कोणत्या संप्रदायात दीक्षित होण्याची किंचितही आवश्यकता नाही. जसे आसन आणि प्राणायाम शरीराची कसरत आहे तसेच विपश्यना मनाची कसरत आहे. याचा अभ्यास कोणत्याही संप्रदायाच्या कोणत्याही व्यक्तीने केला तरी त्याला तेच परिणाम मिळतात, तीच फळे प्राप्त होतात. स्वच्छ जीवन जगण्याची कला हाती लागते. जीवन सुख-शांतीने भरून जाते. असे प्रत्यक्ष घडत आहे. विभिन्न संप्रदायांचे लोक मोठ्या संख्येने शिबिरांमध्ये संम्मिलित होऊन लाभान्वित होत आहेत. विपश्यना स्तूपाची निर्मिती कोणत्याही संप्रदायाच्या स्थापनेसाठी कदापि केली जात नाहीये तर याच्या विपरीत लोकांना भिन्न-भिन्न सांप्रदायिक बंधनातून सोडवून सर्वमान्य शील, सदाचाराचे जीवन जगण्यासाठी आणि चित्ताला एकाग्र करून निर्मळ करण्याच्या विद्येसाठी केली जात आहे. या धर्मस्तूपाचा उद्देश हाच आहे की जे विपश्यी आहेत ते इथे येऊन विपश्यनेत आणखी अधिक पक्क होवोत. जे नाहीत ते विपश्यनेत सामिल होण्याची प्रेरणा प्राप्त करोत.

गुरुदेव सयाजी ऊ बा खिन बर्माहून भारतात कोणता संप्रदाय पाठविण्यासाठी आतुर नव्हते तर सर्व-लोकहित-कारिणी विपश्यना पाठविण्यासाठी आतुर होते. अरे, संप्रदाय तर इथे अनेकानेक आहेत. जे आहेत, त्यांचे जे परिणाम येत आहेत ते आपल्यासमोर आहेतच. संप्रदाय शब्दाचा अर्थ होतो समता प्रदान करणे. पण हे जे संप्रदाय आहेत, मग ते कोणतेही संप्रदाय असोत, ते समता प्रदान करण्याऐवजी समाजात विषमता प्रदान करीत आहेत. अशा अवस्थेत जर आणखी एक संप्रदाय तिथे गेला तर त्या देशाचे काय भले होईल? गुरुदेव या गोष्टीला खूप चांगल्या प्रकारे समजत होते. सार्वजनिक धर्मच भारताचे आणि विश्वाचे कल्याण करेल. हेच त्यांना अपेक्षित होते आणि यासाठीच त्यांच्या पावन स्मृतीत त्यांच्या कल्याणकारी मंतव्याला पूर्ण करण्यासाठी विपश्यना धर्म-स्तूपाची निर्मिती होत आहे.

पुन्हा एक प्रश्न उठतो की दहा हजार साधकांसाठी एका वर्तुळाकार छताखाली, खांबांच्या आधाराविना एका विशाल धर्मकक्षाचे निर्माण करणे हे तर लक्षात येते परंतु यासाठी याच्या बाहेरच्या ढाच्याला रंगूनच्या श्वेडगोन पगोड्याच्या आकृतीचे बनविण्याचा काय अर्थ आहे? त्याचे काय कारण आहे?

यालाही समजून घेतले पाहिजे. धर्माची शुद्धता लक्षात येऊ लागली तर हेही लक्षात येऊ लागेल की कृतज्ञता धर्माचे एक महत्वपूर्ण अंग आहे. ज्या म्यंमा देशाने आपल्या देशाच्या या अनमोल निधीला सुमारे दोन हजार वर्षांपर्यंत इतक्या सजगतेसहित शुद्ध रूपात कायम ठेवले आणि आता आमच्या भल्यासाठी याला परत केले आहे, त्याचे उपकार मानत त्याच्याप्रति कृतज्ञतेचा भाव जागणे नितांत आवश्यक आहे. हेच धर्मानुकूल आहे.

भूतकाळात जेव्हा ही विद्या शेजारील देशांमध्ये गेली तेव्हा तिथल्या लोकांनी जे स्तूप बनविले ते इथल्या भारताच्या त्या काळातील स्तूपांच्या प्रतिकृतीच्या रूपात बनवले. त्याचे एक प्रमुख कारण हेच होते की त्या देशांमध्ये बनलेल्या या स्तूपांना पाहून त्या-त्या देशांच्या लोकांच्या मनात अनेक शतकांपर्यंत भारताच्या प्रति कृतज्ञतेचा भाव जागत राहील, जो आताही जागतच आहे. ठीक अशाच प्रकारे बर्माकडून जेव्हा ही विद्या आपल्याला मिळाली आहे तर बर्माच्या प्रसिद्ध स्तूपाच्या अनुरूप बनलेल्या या स्तूपाला पाहून इथले लोक बर्माच्या प्रति कृतज्ञतेचा भाव जागवतील आणि ही कृतज्ञता शतकानुशतके जागत राहील. याच अभिप्रायाने या आकृतीला स्वीकारले गेले. भव्य स्थापत्यकलेने परिमंडित हा गगनचुंबी विशाल स्तूप भारताच्या प्राचीन अध्यात्म विद्येचे मस्तक उंचावत भारताच्या तसेच विश्वाच्या अनेक लोकांना आकर्षित करेल, आमंत्रित करेल आणि जे या पवित्र भूमीवर येतील त्यातील अनेक विपश्यनेशी जोडले जावून आपले कल्याण साधतील. धर्मस्तूपाच्या निर्माणाचा हा देखील एक प्रमुख पावन उद्देश आहे. अधिकाधिक लोक विपश्यनेने लाभान्वित होवोत! भारतातीलच नाही तर साऱ्या विश्वातील सर्व हिंसात्मक भांडण-तंटे दूर होवोत! पुन्हा एकदा विपश्यनेची पावन धर्मगंगा प्रवाहमान होवो आणि तिच्या प्रभावाने विपुल विश्व कल्याण होवो! या धर्मभावनेने उत्प्रेरित त्या महान गृही संत सयाजी ऊ बा खिन यांच्या प्रति आपली सखोल कृतज्ञता प्रकट करण्याचा हा एक मंगल प्रयास आहे.

कृतज्ञता खरोखर उत्तम मंगल आहे. या ऐतिहासिक महान धर्मयज्ञात आपल्याकडून आहुती अर्पण करताना प्राचीन भारताची दान देण्याची शुद्ध दान-चेतनाही समजून घेतली पाहिजे. प्राचीन भारतात शुद्ध धर्माच्या क्षेत्रात दानाची परंपरा अत्यंत पवित्र असायची, सात्विक असायची. त्याच पवित्रतेची आपल्याला स्थापना करायची आहे ज्यामुळे देशाची गौरव-गरिमा वाढेल आणि लोक-कल्याणही होईल.

प्राचीन परंपरेनुसार जेव्हा एखादा भिक्षू नगरात भिक्षाटनासाठी निघायचा तेव्हा हातात भिक्षा-पात्र घेऊन नजर खाली झुकवून, मौन राहून क्रमश: एक-एका घराच्या समोर साधारणपणे एक-एक मिनिट थांबत चारिका करीत असे. ना तो 'भिक्षामण्डै देहि' असा आवाज द्यायचा आणि ना 'माई मला भूक लागली आहे, बाबा भाकरी द्या, माई भाकरी द्या' असा आग्रह धरायचा. प्राचीन भारतात कोणी भिक्षू भिक्षुक नसायचा. भिक्षू आणि भिक्षुकमध्ये खूप मोठा फरक आहे. जो व्यक्ती विपश्यना साधनेद्वारे भव-संसरणाच्या दु:खांचे भेदन करतो तोच भिक्षू म्हटला जातो. 'भिन्दति दुक्खंति भिक्खु!' तो भीक मागण्यासाठी चारिका करत नसे तर धर्माच्या शुद्ध परंपरेनुसार गृहस्थाला पुण्यजनक अवसर प्रदान करण्यासाठी प्रत्येक

घरासमोर थांबत असे. मिनिटाभरात घराच्या बाहेर कोणी आले नाही तर तो प्रसन्न चित्ताने त्यांच्यासाठी मंगल कामना करीत पुढे जात असे. कोणी बाहेर येऊन त्याच्या पात्रात भोजन टाकले तर त्याच्यासाठीही त्याच प्रकारे मंगल कामना करीत पुढे जात असे.

आणि नेहमी असे व्हायचे की भिक्षूंच्या चारिकेवेळी गृहस्थ स्वत: आपापल्या घरांच्या समोर उत्सुकतापूर्वक त्यांची प्रतीक्षा करायचे. जसेकी शेजारच्या देशांमध्ये आजही होत आहे. धर्मवान गृहस्थ भोजन प्रदान करू शकण्याची संधी दिली गेल्यामुळे भिक्षूचे आभार मानतात. या पावन प्रथेमुळे ना भिक्षूच्या मनात भिकाऱ्यासारखी हीन भावना जागते आणि ना गृहस्थाच्या मनात कोणता अहंकार जागतो. दान देणे आणि दान घेणे, दोन्हीही निष्कलंक असतात. धर्माने परिपूर्ण असतात. सद्धर्माशी संबंधित सर्व दान याच शुद्धतेने दिले गेले पाहिजे. आधी तर मनात ही चेतना जागली पाहिजे की ज्या योजनेसाठी मी दान देत आहे, तिच्या पूर्ण झाल्यावर आजच्याच नाही, तर अनेक शतकांपर्यंत भावी पिढ्यांचे हजारो, लाखो लोक पुन्हा विपश्यनेकडे आकर्षित होतील आणि अशा प्रकारे सर्व दानाची मुळे सहस्त्रावधी वर्षांपर्यंत बलदायी आणि फलदायी बनून राहतील. किती मोठे सौभाग्य आहे की दीर्घकाळापर्यंत फलदायी पुण्य अर्जित करण्याचा मला अशी अनोखी संधी प्राप्त होत आहे. प्रत्येक दानी व्यक्तीच्या मनात अशा प्रकारची भावना जागणे आवश्यक आहे. जे विपश्यी दान देऊ इच्छितात त्यांच्या मनात एक आणखी शुभ चेतना जागली पाहिजे आणि ती ही की आपल्या दादागुरूंनी ही कल्याणकारी विद्या भारताला दिली नसती तर माझे कल्याण कसे झाले असते! तेव्हा या विशाल आयोजनात आपल्या शक्ती-सामर्थ्यानुसार जो कमी-अधिक सहयोग देत आहे तो त्या महान संत सयाजी ऊ बा खिन यांच्या प्रति आपली कृतज्ञता स्थापित करण्याचा केवळ अल्पसा प्रयास मात्र आहे.

भारतात तसेच विश्वात कल्याणी विपश्यनेद्वारे लोक-कल्याणाचे पुण्यकार्य दीर्घकाळापर्यंत गतिमान राहो आणि सर्व-लोक-कल्याणाची त्यांची धर्म कामना पूर्ण होवो, या धर्मचेतनेने दिलेला कोणताही सहयोग थोडा असो की अधिक, खरोखर खूप पुण्यफलदायीच असेल. भारत आपल्या प्राचीन गौरवासहित पुन्हा जागो! विपश्यना विद्येचा हा अनमोल शिरोमणि आपल्या मस्तकावर धारण करून विश्वातील जन-जनांच्या शांतीसाठी अहिंसेचे हे प्रयोगात्मक प्रशिक्षण संपूर्ण विश्वात पसरो! याच्या प्रभावाने साऱ्या विश्वाचे मंगल होवो! साऱ्या विश्वाचे कल्याण होवो! साऱ्या विश्वात विपश्यना विद्या पसरो! दु:खितांचे दु:ख दूर होवो! सर्वांना शांती मिळो, सुख मिळो! सर्वांचे कल्याण होवो! मंगल होवो! सर्वांची स्वस्ति-मुक्ती होवो! स्वस्ति-मुक्ती होवो!

---

*शाक्यमुनी गौतम बुद्धांपासून ते सयाजी ऊ बा खिनजी यांच्यापर्यंत सर्व धर्माचार्यांच्या प्रति आमची असीम कृतज्ञता आहे. जर त्यांच्याद्वारे धर्माचे प्रसारण झाले नसते आणि त्यांनी सहस्त्रावधी वर्षांपर्यंत याला नितांत शुद्ध स्वरुपात सुरक्षित ठेवले नसते तर आम्ही या जीवनात धर्माच्या या अनमोल रत्नाला कसे प्राप्त केले असते?*

*आम्ही आपली सखोल निष्ठा आणि असीम कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या स्मृतीत आपले मस्तक नमवित आहोत.*

*– सयाजी स० ना० गोयंका*

(विपश्यना पगोडा स्मरणिका मधून साभार उद्धृत)

## पूज्य माताजींची मुलाखत

श्रीमती इलायची देवी गोयंका, की ज्या आपल्या परिवारात आणि साधकांमध्ये 'माताजी' या नावाने ओळखल्या जातात. (आदरणीय माताजी: भारतीय महिलांकरीता सन्मानजनक संबोधन) यांचा जन्म बर्माच्या जुन्या राजधानीत 'मांडले' येथे जानेवारी, 1930 ला झाला. त्यांचे पूर्वज राजस्थाना (भारता) तून सुमारे शंभर वर्षांपूर्वी बर्माला गेले होते. ते अन्नधान्य आणि इतर दुसऱ्या वस्तूंचा व्यवसाय करीत असत. माताजी तीन संततींमधून; एक पुत्र आणि दोन कन्यांमधून एक होत्या.

माताजी आपल्या बालपणातील सुरुवातीची बारा वर्षे गोयंका परिवाराच्या जवळच मांडले येथे राहिल्या. जसे की त्या काळचा रिवाज होता- लहान वयातच विवाह करून दिला जात असे त्याप्रमाणे त्यांचाही वाङ्:निश्चय गोयंकाजींशी झाला.

गोयंकाजी आणि माताजींचा विवाह मांडले येथे 1942 मध्ये झाला. विवाहाच्या थोड्याच कालावधीनंतर जपान्यांनी मांडले शहरावर मोठे हवाई बॉम्बहल्ले करणे सुरु केले. लोक बर्मा सोडून पळू लागले. त्यावेळी गोयंकाजी आणि माताजींच्या परिवाराचे लोकही भारतात आले जिथे ते युद्धकाळापर्यंत राहिले. माताजींचा परिवार उत्तर-पश्चिमी भारतात राहू लागला जिथे त्यांच्या पिताश्रींनी पंजाब व गुजरातमध्ये जीवन-चरितार्थासाठी काम करणे सुरू केले. गोयंकाजींचा परिवार काही काळ चुरू, राजस्थानमध्ये राहिल्यानंतर दक्षिण भारतात राहू लागला. माताजीही आपल्या पतीसोबत राहू लागल्या.

युद्धानंतर, गोयंकाजी आणि माताजी पुन्हा बर्माला परतले आणि रंगूनमध्ये स्थायिक झाले, जिथे ते सहा मुलांसहित एका मोठ्या संयुक्त परिवाराचे पालन-पोषण करण्याच्या उत्तरदायित्वासहित सफल व्यापारी आणि भारतीय समाजाचे नेतृत्व करणारे बनले.

गोयंकाजींनी 1955 मध्ये, सयाजी ऊ बा खिन यांच्याबरोबर पहिले शिबिर केले. माताजी तसेच परिवारातील इतर सदस्यांनी आणि मित्रांनीही शिबिरे केली आणि ते सर्व सयाजींच्या मार्गदर्शनात अभ्यास करू लागले. सन 1969 मध्ये गोयंकाजी भारतात आले आणि त्यांनी विपश्यना शिबिरे घेणे सुरु केले. माताजी सयाजींच्या मृत्यूपश्चात 1971 मध्ये भारतात आल्या आणि मग हळूहळू संपूर्ण परिवारच मुंबईत स्थायिक झाला.

गोयंकाजी आणि माताजी सहा पुत्र, सहा सुना आणि अकरा नातवंडे तसेच इतर नातेवाईकांसहित मुंबईमध्ये, परंपरागत संयुक्त परिवारात एकत्र राहत होते. त्यानंतर काही मुले वेगळी राहू लागली.

खाली दिलेली मुलाखत ऑक्टोबर, 1991 मध्ये एका अनुवादकाच्या माध्यमातून घेण्यात आली आणि इंग्रजीच्या विपश्यना जर्नलमध्ये छापली गेली.

(पूज्य माताजींच्या 9 व्या पुण्यतिथीवर श्रद्धांजली स्वरूपात त्यांच्या घेतलेल्या मुलाखतीचा प्रारंभिक भाग इथे दिला आहे. उर्वरित भाग पुढील अंकात)

---

### नवीन उत्तरदायित्व
### वरिष्ठ सहायक आचार्य

1. श्री विजय मुखेडकर, पुणे
2. श्रीमती नीलम ओसवाल, पुणे

### अतिरिक्त उत्तरदायित्व

1. श्रीमती सुजाता खन्ना, धम्म विपुल विपश्यना केंद्र, बेलापुरच्या केन्द्र आचार्यांची सहायता
2. श्री प्रवीन कटपटल, धम्म विपुल विपश्यना केंद्र, बेलापुर च्या केन्द्र आचार्यांची सहायता
3. डॉ. संग्राम जोंधळे, (केंद्र आ., धम्म देश हिंगोली), मराठवाडा क्षेत्र के समन्वयक क्षेत्रीय आचार्यांची सहायता

### नव नियुक्ती
### सहायक आचार्य

1. श्री नितिन मसरानी, मुंबई
2. श्री अमोल मिठारी, कोल्हापूर

3-4. श्री प्रशांत व श्रीमती शिल्पा देवरे, धुले

5. श्रीमती माधवी संघवी, राजकोट

6-7. श्री मनोज व श्रीमती छाया गांधी, सूरत

8. श्रीमती जी जानसी रानी, बेंगलुरु
9. श्रीमती स्वाथी गाढे, हैदराबाद
10. श्री मेघराज पोखरेल, नेपाळ
11. श्री कमल प्रसाद उप्रेती, नेपाळ
12. श्रीमती हरिप्रिया आर्यल, नेपाळ
13. कु. रामेश्वरी महर्जन, नेपाळ
14. Mr. Seng Vutea, cambodia
15. Mrs. Supreeya Pongsakul, Thailand
16. Miss.Vilaiporn Chaiphanittrakul, Thailand
17. Mrs. Kitima Silabutr, Thailand
18. Mr. Suchin Thongnoppakun, Thailand

## मंगल मृत्यू

1. अकोला जिल्ह्यातील 'धम्म मञ्जूसा' विपश्यना केंद्राचे केंद्र-आचार्य श्री नंदूजी वि. तायडे, 10 डिसेंबर 2024 ला शांतीपूर्वक दिवंगत झाले. शेवटच्या क्षणापर्यंत ते अत्यंत सजग आणि साधनारत राहिले. 2001 पासून त्यांनी अनेक शिबिरांचे संचालन, व्यवस्था तसेच केंद्रांच्या निर्मितीत महत्वपूर्ण भूमिका निभावली. ते निर्वाणलाभी होवोत, त्यांची स्वस्ति मुक्ती होवो!
2. उल्हासनगर (ठाणे) येथील वरिष्ठ सहायक आचार्य, 74 वर्षीय श्री अशोक सिंगापुरे 15 डिसेंबर 2024 ला शांतीपूर्वक दिवंगत झाले. ते 2017 पासून सातत्याने बिहार आणि महाराष्ट्रातील केंद्रांवर सेवा देत राहिले आणि अनेकांच्या कल्याणात सहायक बनले. धर्मपथावर उत्तरोत्तर त्यांची प्रगती होत राहून ते निर्वाणलाभी होवोत, त्यांची स्वस्ति-मुक्ती होवो!
3. बट्टमबंग, कंबोडियाच्या 'धम्म लट्ठिका' केंद्राचे केंद्र-आचार्य श्री फ्रैंकोइस कुओच 19 डिसेंबर 2024 ला अल्पकालिक आजाराने दिवंगत झाले. त्यांनी कित्येक वर्षांपर्यंत शिबिरांचे संचालन केले, स. आचार्यांना प्रशिक्षण दिले आणि धम्म-प्रशिक्षण सामग्रीच्या खमीर भाषेतील अनुवादाचे तसेच रेकार्डिंगचे काम केले. ते निर्वाणलाभी होवोत, त्यांची स्वस्ति-मुक्ती होवो!

--------------------

## ग्लोबल विपश्यना पगोडा, गोराई, मुंबईमध्ये

**एक दिवसीय महाशिबिर (Mega Course) कार्यक्रमः**

1. **रविवार 19** जानेवारी 2025 ला सयाजी ऊ बा खिन यांची पुण्य-तिथि (19-1-1971) व माताजींच्या पुण्य-तिथि (5 जानेवारी 2016) च्या निमित्ताने **एक दिवसीय** महाशिबिर होतील.
2. **रविवार**- 11 मे, 2025 बुद्ध-पौर्णिमेच्या निमित्ताने.
3. रविवार- 13 जुलै, आषाढ़-पौर्णिमे (धम्मचक्कपवत्तन दिवस) च्या निमित्ताने.
4. रविवार 5 ऑक्टोबरला शरद-पौर्णिमा तसेच पूज्य गोयन्काजींच्या पुण्यतिथी निमित्ताने.

**2. एक दिवसीय शिबिर दररोज**

या व्यतिरिक्त विपश्यना साधकांसाठी पगोडा मध्ये दररोज एक दिवसीय शिबिर आयोजित केली जात आहे. कृपया सामील होण्यासाठी खालील लिंक चा उपयोग करावा. आणि एक मोठ्या सामूहिक तप-सुखाचा लाभ घ्यावा. *समग्गानं तपोसुखो।* **सर्वांसाठी संपर्क: 022 50427500 (Board Lines)** - Extn. no. 9, मो. **+91 8291894644.** (दररोज 11 ते 5 वाजेपर्यंत)

Online registration: http://oneday.globalpagoda.org/register; Email: oneday@globalpagoda.org

**3. 'धम्मालय' विश्राम गृह**

एक दिवसीय महाशिबिरासाठी आल्यावर रात्री **'धम्मालय'** मध्ये विश्रातीसाठी सुविधा उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी आणि (बुकिंग) नोंदणीसाठी **संपर्कः** 022 50427599 or email- *info.dhammalaya@globalpagoda.org* or *info@globalpagoda.org*

## दोहे धर्माचे

जनजनाचे कल्याण रे, स्तूप स्थापना होय।
जागे विश्व विपश्यना, जन-मन मंगल होय॥
चिरा चिरा रे जोडूनी, चैत्य झाला तयार।
खाली बसून ध्यान करी, मिळे रे सुख अपार॥
या मंगलमय स्तूपाने, धर्म प्रकाशित होय।
जन-जन हित-सुख साधे, भले विश्वाचे होय॥
धन्य! ध्यानाची लेणी, धन्य! ध्यानाचा स्तूप।
शांती सर्वांनाच मिळे, भिक्षू असो वा भूप॥

## दोहे धर्माचे

धन्य दिले गुरुदेवजी, विपश्यनेचे दान।
हृदय तर हरकित झाले, पुलकित झाले प्राण॥
धन्य भाग्य गुरुदेवजी, पकडी माझा हात।
मुक्तीदायक च पथ दिला, धर्म स्तूपाची साथ॥
गुरुंची करुणा जागे, झाले कसे कल्याण।
तृषिताला अमृत मिळे, मिळे धर्म वरदान॥
सद्गुरु ने कृपा केली, दिले धर्माचे नीर।
धुतले स्वयम् आपणच, आपले मलीन चीर॥

"विपश्यना विशोधन विन्यास" साठी प्रकाशक, मुद्रक व संपादकः राम प्रताप यादव, धम्मगिरी , इगतपुरी- 422 403, दूरध्वनी: (02553) 244086, 244076·
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, 259, सीकॉफ लिमिटेड, 69 एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-422 007. बुद्धवर्ष 2568, पौष पौर्णिमा, 13 जानेवारी, 2025, वर्ष 8 अंक 10

वार्षिक शुल्क रु. 100/-, US $ 50, (भारताबाहेर पाठविण्यासाठी) रजि. नं. MAHMAR/2017/72685. Postal Regi. No. NSK 286/2024-2026

Posting day- **Purnima of Every Month**, Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.) **(किरकोळ विक्री होत नाही)**
**DATE OF PRINTING: 30 DECEMBER, 2024, DATE OF PUBLICATION: 13 JANUARY, 2025**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
फोन : (02553) 244998, 243553, 244076, 244086, 244144, 244440
Email: vri_admin@vridhamma.org;
Course Booking: info.giri@vridhamma.org
Website: www.vridhamma.org